**CNR No. MHRG05-010774-2025**
**<u>एस. सी. सी क्र. ८५४०/२०२५</u>**

**श्रीमती एस. यू. जागुष्टे, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पनवेल यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | २७/०३/२०२५ |
| २. | फिर्याद दाखल तारीख | : | २७/०३/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे नांव | : | श्री. संदिप बळीराम भोईर, रा. आशिष सोसायटी, बिल्डींग नं. ए– ६८, रूम नं. ११, सेक्टर ०६, कळंबोली, नवी मुंबई. |
| ४. | आरोपीचे नांव | : | रामलाल रामपाल लाल, वय ३१ वर्षे रा. रूम नं.०६, समर्थ कृपा चाळ, खेडकाली गांव, देसाई नाका, डोंबीवली, जि. ठाणे |

५. **अपराधाचा तपशिल** –

तुम्ही दिनांक २७/०३/२०२५ रोजी दुपारी १२.१० वा. पनवेल–मुंब्रा हायवे, पनवेल कडे जाणा–या वाहिनीवर सार्वजनिक रस्त्यावर तुमचे ताब्यातील ट्रक क्र. एमएच ०५ ई.एल ९१३९ भरधाव वेगाने, धोकादायक आणि निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी आणि साक्षीदार बसलेल्या मोटार कार क्रमांक एमएच ४६ एएल ०३५९ च्या पुढील डाव्या बाजुस धडक देवुन तो फिर्यादी यांच्या दोन्ही पायांना मुक्कामार, साक्षीदार अझीम मोकाशी यांच्या डोक्याला व छातीला मुक्कामार तसेच साक्षीदार कारचा चालक नामे आमीर अजहर आलम शेख यांच्या नाकाला दुखापतीस कारणीभुत ठरणारी कृती केली, म्हणुन त्यामुळे तुम्ही बी.एन.एस चे कलम २८१, १२५(अ) सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा केला आहे.

६. **आरोपीचे प्रतिकथन :**

प्रश्न १ : तुम्हाला फिर्याद/दोषारोपपत्राची प्रत मिळाली का?

उत्तर : होय

प्रश्न २ : तुम्हाला अपराधाचा तपशिल समजला का?

उत्तर : होय

प्रश्न ३ : तुम्हाला अपराध कबूल आहे काय?

उत्तर : होय

——————————————

(आरोपीची सही) समक्ष

SANJANA UDAY JAGUSTE Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE Date: 2025.07.31 13:09:49 +0530

(एस. यू. जागुष्टे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्रमांक ३, पनवेल

दिनांक : १८/०७/२०२५.

## आदेश

१. प्रस्तुतच्या गुन्हयात आरोपी आज न्यायालयासमोर हजर झाले. त्यावेळी आरोपीस गुन्हयाचे स्वरुप व त्याची शिक्षा वाचून व समजावून सांगण्यात आली असता, त्याने स्वत:हून गुन्हा कबुल असल्याचे मान्य केले. त्यामुळे आरोपीचे प्रतिकथन हे एच्छीक आहे. आरोपीस शिक्षेसंबंधी विचारले असता त्यास कमीत कमी दंड करण्यात यावा अशी विनंती केली.

२. आरोपीने स्वत:हून एच्छीकरीत्या अपराध कबुल केल्यामुळे गुन्हयाचे स्वरुप व त्या संबंधिची शिक्षा एकत्रीत विचारात घेउन, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे:—

**आदेश**

१. आरोपी बी.एन.एस चे कलम २८१ या अपराधासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ नुसार त्यास रक्कम रुपये ८००/— (अक्षरी आठशे रुपये फक्त) भरण्याची शिक्षा करण्यात येते व आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद भोगावी.

२. आरोपी बी.एन.एस चे कलम १२५ (अ) या अपराधासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ नुसार त्यास रक्कम रुपये ४०००/— (अक्षरी चार हजार रुपये फक्त) भरण्याची शिक्षा करण्यात येते व आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद भोगावी.

३. आरोपी मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ या अपराधासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ नुसार त्यास रक्कम रुपये ४०००/— (अक्षरी चार हजार रुपये फक्त) भरण्याची शिक्षा करण्यात येते व आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद भोगावी.

४. सदर आदेशाची एक प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी.

SANJANA UDAY JAGUSTE

Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE
Date: 2025.07.31 13:10:01 +0530

(एस. यू. जागुष्टे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्रमांक ३, पनवेल

दिनांक : १८/०७/२०२५.